मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेच्या कर संकलन विभागाचे करदात्यांना नवीन वर्षाचे 'डबल गिफ्ट'

## रजिस्टर ऑनलाईन; मालमत्ता उताराही मिळणार ऑनलाईन

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या वतीने गेल्या दोन वर्षात मालमत्ता धारकांना घर बसल्या उच्च दर्जाच्या सुविधा देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहे. याच अनुषंगाने आता विभागाने मालमत्ता धारकांना नवीन वर्षानिमित्त डबल गिफ्ट दिले आहे. १ जानेवारीपासून असेसमेंट रजिस्टर ऑनलाईन करण्यात आले आहे. यापुढे एक जानेवारीपासून होणाऱ्या सर्व नोंदी फक्त ऑनलाईन होतील. एक जानेवारीपासून मिळकत कर उतारा ऑनलाईन काढण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पिंपरी-चिंचवड शहरामध्ये सध्या ६ लाख १५ हजार विविध मालमत्ता आहेत. या मालमत्ताधारकांना कर आकारणी व करसंकलन विभागामार्फत कराची आकारणी व वसूलीची कार्यवाही करण्यात येते. यासाठी १७ विभागीय करसंकलन कार्यालये कार्यरत आहेत.

मालमत्ता धारकांना विविध शासकीय कामांसाठी मालमत्ता कर उतारा लागतो. हा उतारा काढण्यासाठी यापूर्वी नागरिकांना प्रत्यक्ष कर संकलन कार्यालयात जावे लागायचे. त्यानंतर मालमत्ता आकारणी पुस्तकात उतारे शोधावे




लागत होते. त्यानंतर हा उतारा हस्तलिखित स्वरूपात दिला जात होता. यासाठी विलंब लागत होता. आता १ जानेवारीपासून सर्व प्रक्रिया ऑनलाईन करण्यात आली आहे. १ जानेवारीनंतर ज्यांची ऑनलाईन नोंदणी होणार आहेत त्यांना तो उतारा तत्काळ मिळेल. यासाठी नाममात्र असे २० रूपये शुल्क भरावे लागणार आहे. ३१ डिसेंबर २०२३ पूर्वीच्या नोंदी नोंद वहीमध्ये नोंदविलेल्या असल्यामुळे संबंधित मालमत्ता धारकांना मालमत्ता उतारा या टॅबवर क्लिक केले की त्याचा तपशील संबंधित झोन कार्यालयाकडे वर्ग केला जाईल. त्यानंतर संबंधित गट लिपीक असेसमेंट रजिस्टरमधील त्या मालमत्तेच्या नोंदी कॉम्प्युटरमध्ये फिड करतील. त्यानंतर संबंधित मालमत्ता धारकांच्या ई-मेल आणि मोबाईलवर लिंक पाठविण्यात येईल. या लिंकवर क्लिक केले की दाखला मिळेल. अथवा महापालिकेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन दाखला मिळेल. त्यामुळे १ जानेवारीपासून ऑफलाईन सुविधा बंद करण्यात येणार आहे. महापालिकेच्या संकेतस्थळावर जाऊन कर आकारणी व कर संकलन विभागाचा पर्याय निवडावा. यामध्ये मोबाईल क्रमांक किंवा मालमत्ता क्रमांक टाकला की त्यामध्ये वेगवेगळे पर्याय दिसतील. मालमत्ता कर उतारा हा पर्याय निवडावा. त्यानंतर फक्त क्लिक करा आणि मालमत्ता कर उतारा मिळवा. ही प्रक्रिया ओटीपी आधारित असल्याने नागरिकांना त्यांच्या मालमत्तेला आपला मोबाईल क्रमांक लिंक करावा लागणार आहे. आतापर्यंत जवळपास साडे चार लाख मालमत्तांना मोबाईल नंबर लिंक केलेले आहेत. उर्वरित मालमत्ता धारक यांनीही आपले मोबाईल नंबर आपल्या मालमत्तेला लिंक करण्याचे पालिकेने आवाहन केले आहे. कर संकलन व कर आकारणी विभागाची जबाबदारी मिळाल्यानंतर सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी मालमत्ता धारकांना घर बसल्या ऑनलाईन सुविधा कशा प्रकारे उपलब्ध होतील यासाठी सातत्याने प्रयत्न केले. त्यामुळे सुरुवातीला मालमत्ता धारकांचे मोबाईल क्रमांक लिंक करण्यात आले.

# पर्यावरण संवर्धनासाठी आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार!

## डुडूळगाव येथील जागेत देशी वृक्ष लागवडीसाठी पाठपुरावा

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

मोशी येथील वनविभागाच्या जागेत भारतीय प्रजातीच्या वृक्षांची लागवड करणे अपेक्षीत असून, त्यासाठी सदर जागा महापालिका प्रशासनाकडे हस्तांतरित करावी, अशी मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे. याबाबत पुणे वन विभागाचे उप वनसंरक्षक यांना निवेदन देण्यात आले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड शहर परिसरात डुडूळगाव व मोशी येथील हद्दीवर गट क्रमांक १९० व गट क्रमांक ३१६ ही राज्य शासनाच्या वन विभागाची जागा आहे. या जागेत ग्लिरीसिडीया या परदेशी झाडांची लागवड करण्यात आली आहे. वास्तविक, त्यापूर्वी या परिसरातील डोंगरावर गवत मोठ्या प्रमाणात उगवत होते. व त्यामुळे जनावरांना





चारा उपलब्ध होत होता. परंतु, परदेशी वनस्पतींच्या लागवडीनंतर गवत देखील या परिसरात कमी झाले आहे. तसेच, शहरातील नागरिकांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जागरुकता जोपासण्यासाठी वृक्ष लागवड करून पर्यावरण प्रेमी नागरिकांना येथे

> "संरक्षणाकरिता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ताब्यात दिली आहे. त्याच धर्तीवर डुडूळगाव व मोशी येथील वनविभागाची जागा पर्यावरण संवर्धनासाठी विकसित करावी. त्याचा फायदा नागरिकांना होईल.
> – **महेश लांडगे**, आमदार, भोसरी विधानसभा,

प्रवेश खुला केला पाहिजे. यासह संबंधित जागेचे संरक्षणही होणे अपेक्षीत आहे. या करिता सदर जागेवर नियोजनबद्धरित्या वड, पिंपळ, चिंच, कळस, बांबू, हिवर, खैर यांसारख्या भारतीय प्रजातींच्या वृक्षांची लागवड करावी, अशी मागणीही आमदार लांडगे यांनी केली आहे.

# घर बसल्या करता येणार मालमत्तेची नोंदणी

## शहरवासीयांना मालमत्तेची ऑनलाइन नोंदणी करण्याची सुविधा

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने नवीन वर्षानिमित्त शहरवासीयांना मालमत्तेची ऑनलाइन नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. आजपासून होणाऱ्या सर्व नोंदी फक्त ऑनलाइन होणार आहेत. मालमत्ता कर उताराही ऑनलाइन काढण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे मालमत्ता नोंदणीसाठी महापालिकेत हेलपाटे मारावे लागणार नाहीत.पिंपरी- चिंचवड शहरामध्ये सध्या सहा लाख १५ हजार विविध मालमत्ता आहेत. या मालमत्ताधारकांना कराची आकारणी व वसुलीची कार्यवाही करण्यात येते. यासाठी १७ विभागीय करसंकलन कार्यालये कार्यरत आहेत. मालमत्ता धारकांना विविध शासकीय कामांसाठी मालमत्ता कर उतारा लागतो. हा उतारा काढण्यासाठी यापूर्वी नागरिकांना प्रत्यक्ष कर संकलन कार्यालयात जावे लागायचे. त्यानंतर मालमत्ता आकारणी पुस्तकात उतारे शोधावे लागत होते. त्यानंतर हा उतारा हस्तलिखित स्वरुपात दिला जात होता. यासाठी विलंब लागत होता. आजपासून सर्व प्रक्रिया ऑनलाइन करण्यात आली आहे. एक जानेवारीनंतर ज्यांची ऑनलाईन नोंदणी होणार आहे, त्यांना उतारा तत्काळ मिळेल. यासाठी नाममात्र असे २० रुपये शुल्क भरावे लागणार आहे. महापालिकेच्या संकेतस्थळावर जाऊन



कर आकारणी व कर संकलन विभागाचा पर्याय निवडावा लागेल. मोबाईल क्रमांक किंवा मालमत्ता क्रमांक टाकला की त्यामध्ये वेगवेगळे पर्याय दिसतील. मालमत्ता कर उतारा हा पर्याय निवडावा लागेल. त्यानंतर 'क्लिक' करून मालमत्ता कर उतारा मिळवता येणार आहे. ही प्रक्रिया ओटीपी आधारित असल्याने नागरिकांना त्यांच्या मालमत्तेला आपला मोबाईल क्रमांक लिंक करावा लागणार आहे. आतापर्यंत जवळपास साडेचार लाख मालमत्तांना मोबाईल नंबर जोडले (लिंक) केलेले आहेत. उर्वरित मालमत्ताधारकांनीही मोबाईल नंबर आपल्या मालमत्तेला जोडण्याचे आवाहन केले आहे. ना हरकत दाखला, मालमत्ता हस्तांतरण, विविध कर सवलत योजना प्रक्रिया ऑनलाइन सुविधा, कर संवाद, तू करदाता तू करविता यातून प्रक्रियेची माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. याचा नागरिकांना मोठा फायदा होत आहे.महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने नवीन वर्षानिमित्त शहरवासीयांना मालमत्तेची ऑनलाइन नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. आजपासून होणाऱ्या सर्व नोंदी फक्त ऑनलाइन होणार आहेत. मालमत्ता कर उताराही ऑनलाइन काढण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे मालमत्ता नोंदणीसाठी महापालिकेत हेलपाटे मारावे लागणार नाहीत.पिंपरी- चिंचवड शहरामध्ये सध्या सहा लाख १५ हजार विविध मालमत्ता आहेत. या मालमत्ताधारकांना कराची आकारणी व वसुलीची कार्यवाही करण्यात येते. यासाठी १७ विभागीय करसंकलन कार्यालये कार्यरत आहेत. मालमत्ता धारकांना विविध शासकीय कामांसाठी मालमत्ता कर उतारा लागतो. हा उतारा काढण्यासाठी यापूर्वी नागरिकांना प्रत्यक्ष कर संकलन कार्यालयात जावे लागायचे. त्यानंतर मालमत्ता आकारणी पुस्तकात उतारे शोधावे लागत होते. त्यानंतर हा उतारा हस्तलिखित स्वरुपात दिला जात होता. यासाठी विलंब लागत होता. आजपासून सर्व प्रक्रिया ऑनलाइन करण्यात आली आहे. एक जानेवारीनंतर ज्यांची ऑनलाईन नोंदणी होणार आहे, त्यांना उतारा तत्काळ मिळेल. यासाठी नाममात्र असे २० रुपये शुल्क भरावे लागणार आहे. महापालिकेच्या संकेतस्थळावर जाऊन कर आकारणी व कर संकलन विभागाचा पर्याय निवडावा लागेल. मोबाईल क्रमांक किंवा मालमत्ता क्रमांक टाकला की त्यामध्ये वेगवेगळे पर्याय दिसतील.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शनिवारी किवळेत सभा

## शिवसेना उपनेते, खासदार श्रीरंग बारणे यांची माहिती

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** शिवसेनेने आगामी लोकसभा निवडणुकीची जोरदार तयारी सुरू केली असून मुख्य नेते, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसंकल्प अभियानाला पुण्यातून सुरुवात होणार आहे. येत्या शनिवारी (दि.६) सायंकाळी साडेचार वाजता किवळे येथे मुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत मार्गदर्शन मेळावा होणार असल्याची माहिती शिवसेना उपनेते, मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शासन आपल्या दारी हा नाविन्यपूर्ण उपक्रम राज्यभर राबविला. या उपक्रमामुळे राज्यातील जनतेला एकाच छताखाली विविध कागदपत्रे मिळाली. थेरगाव, मावळमध्ये देखील हा उपक्रम झाला होता. या उपक्रमाच्या माध्यमातून मुख्यमंत्री शिंदे हे महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात गेले. लोकांसाठी विविध कल्याणकारी योजना सुरू केल्या. त्यामुळे राज्यातील



जनता त्यांच्या कामावर खुश आहे. आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पुन्हा महाराष्ट्राचा दौरा करणार आहेत. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री शिंदे राज्याचा दौरा करत आहेत. शिवसेनेचे खासदार असलेल्या, मागीलवेळी शिवसेनेने निवडणूक लढविलेल्या मतदारसंघात मुख्यमंत्री शिंदे जाणार आहेत. त्यांच्या शिवसंकल्प अभियानाला पुण्यातून सुरुवात होणार आहे. लोकसभा मतदारसंघातील कार्यकर्त्यांचा किवळेतील मुकाई चौकात शनिवारी मुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत मार्गदर्शन मेळावा होणार आहे. या मेळाव्याला मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेनेचे पदाधिकारी, शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन खासदार बारणे यांनी केले. शिवसेनेने आगामी लोकसभा निवडणुकीची जोरदार तयारी सुरू केली असून मुख्य नेते, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसंकल्प अभियानाला पुण्यातून सुरुवात होणार आहे. शनिवारी सायंकाळी साडेचार वाजता किवळे येथे मुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत मार्गदर्शन मेळावा होणार असल्याची माहिती शिवसेना उपनेते, मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली. शिंदे यांनी शासन आपल्या दारी हा नाविन्यपूर्ण उपक्रम राज्यभर राबविला.

# विजय शिवतारे खोटारडा माणूस!

## ३२ हजार मतदार बोगस असल्याच्या आरोपावर जगतापांचे उत्तर





**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
पुरंदरमध्ये ३२ हजार मतदार हे बोगस असल्याचं म्हणणारा विजय शिवतारे हा खोटारडा आणि बाजार बुणगा माणूस असल्याची टीका काँग्रेसचे आमदार संजय जगताप यांनी केला. एकाच वेळी ३२ हजार लोकांना नोटिस देणाऱ्या प्रशासनाने तेवढे लोक एकाच दिवशी आले तर काय करणार याचीही माहिती द्यावी असं ते म्हणाले. राज्याचे माजी मंत्री विजय शिवतारे यांनी संजय जगताप यांच्यावर केलेल्या आरोपांना त्यांनी उत्तर दिलं. पुरंदर विधानसभा मतदारसंघांमध्ये ३२ हजार बोगस मतदार नोंद (झींॲरपवरॲ ईसीं तींशॲ) असल्याचा आरोप माजी मंत्री विजय शिवतारे यांनी केला होता. या आरोपानंतर आता पुरंदरचे आमदार संजय जगताप हे चांगलेच आक्रमक झाले आहेत. विजय शिवतारे बाजार बुनगे असल्याचं संजय जगताप म्हणाले आहेत. ३२ हजार लोकांना निवडणूक आयोगाच्यावतीने नोटीस देण्यात आलेल्या आहेत. त्यांना ४ जानेवारीला सासवड येथे बोलण्यात आले आहे. यासंबंधी आमदार संजय जगताप यांनी प्रशासनाला चांगलंच धारेवर धरलं. पुरंदर तालुक्यातील तहसील कार्यालयात जाऊन आमदार संजय जगताप यांनी निवडणूक विभागाला याचा जाब विचारला. ३२ हजार लोक एकाच दिवशी येणार असतील तर त्यांच्यासाठी काय सोय केली आहे? असा प्रश्न त्यांनी विचारला. यापूर्वीच आम्ही याबाबतची तक्रार निवडणूक आयोगाकडे केली होती. मात्र त्याच्यावर कोणती कारवाई झाली? असा सवालही त्यांनी विचारला आहे. शिवसेना शिंदे गटाचे तालुकाध्यक्ष आणि युवा सेना तालुका अध्यक्ष या दोघांच्याही कुटुंबीयांची नावे दोन गावात असून त्यांच्यावर कारवाई का करण्यात आली नाही? असा सवाल आमदार संजय जगताप यांनी विचारलाय. पुरंदर हवेलीचे आमदार संजय जगताप यांना मतदर यादीत दोन ठिकाणी नावे असल्याच्या कारणावरून नोटिस धाडण्यात आली आहे. ४ जानेवारीला आमदार संजय जगताप यांना कागदपत्रे घेऊन पुरंदर येथील उपविभागीय कार्यालयात हजर राहण्यास सांगितले आहे. दोन दिवसांपूर्वी माजी राज्यमंत्री विजय शिवतारे यांनी पुरंदर हवेलीमध्ये ३२ हजार बोगस मतदार असल्याचा आरोप केला होता. हे सर्व बोगस मतदार विश्वजीत कदम यांच्या मतदारसंघातील असल्याचा देखील आरोप विजय शिवतारे यांनी केला होता. त्यावर आमदार संजय जगताप यांनी प्रतिक्रिया दिली होती की, सरकार तुमचे आहे चौकशी करा आणि कारवाई करा. त्यानंतर पुरंदर मधील अनेक मतदारांना नोटिसा गेल्या आहेत. आणि ४ जानेवारीला तालुक्याच्या ठिकाणी हजर राहण्यास सांगितला आहे. अशाच प्रकारची नोटीस आमदार संजय जगताप यांना देखील केली आहे. जर हजर राहिला नाहीत तर मतदार यादीतून नाव काढले जाईल अशी नोटिस धाडल्याने आमदार संजय जगताप आक्रमक झाले आहेत. ३२ हजार लोकांना निवडणूक आयोगाच्यावतीने नोटीस देण्यात आलेल्या आहेत. त्यांना ४ जानेवारीला सासवड येथे बोलण्यात आले आहे. यासंबंधी आमदार संजय जगताप यांनी प्रशासनाला चांगलंच धारेवर धरलं. पुरंदर तालुक्यातील तहसील कार्यालयात जाऊन आमदार संजय जगताप यांनी निवडणूक विभागाला याचा जाब विचारला. असा प्रश्न त्यांनी विचारला. यापूर्वीच आम्ही याबाबतची तक्रार निवडणूक आयोगाकडे केली होती. मात्र त्याच्यावर कोणती कारवाई झाली? असा सवालही त्यांनी विचारला आहे.

### संजय जगताप यांना नोटिस

**» विजय शिवतारे यांनी पुरंदर हवेलीमध्ये ३२ हजार बोगस मतदार असल्याचा आरोप केला होता. हे सर्व बोगस मतदार विश्वजीत कदम यांच्या मतदारसंघातील असल्याचा देखील आरोप विजय शिवतारे यांनी केला होता. त्यावर आमदार संजय जगताप यांनी प्रतिक्रिया दिली होती की, सरकार तुमचे आहे चौकशी करा आणि कारवाई करा. त्यानंतर पुरंदर मधील अनेक मतदारांना नोटिसा गेल्या आहेत.जर हजर राहिला नाहीत तर मतदार यादीतून नाव काढले जाईल अशी नोटिस धाडल्याने आमदार संजय जगताप आक्रमक झाले आहेत. ३२ हजार लोकांना निवडणूक आयोगाच्यावतीने नोटीस देण्यात आलेल्या आहेत. पुरंदरमध्ये ३२ हजार मतदार हे बोगस असल्याचं म्हणणारा विजय शिवतारे हा खोटारडा आणि बाजार बुणगा माणूस असल्याची टीका काँग्रेसचे आमदार संजय जगताप यांनी केला.**

# शिरूर लोकसभा मतदारसंघावर शिंदे गटाचा दावा?

## शिंदे गट विरुद्ध पवार गटात संघर्ष पाहायला मिळण्याची शक्यता





**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
उपमुख्यमंत्री अजित पवारांनी (अक्षळीं झुरुॲ) शिरूर लोकसभा मतदारसंघावर (डहळऑॲ डेन्न डरलहर उेपींर्ळीशपलू) परस्पर दावा ठोकल्यानंतर आता लगेचच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे (उच्‌ एज्ञपरींह डहळपवश) त्यांना प्रतिउत्तर देण्यासाठी शिरूर लोकसभेत येतायेत. मुख्यमंत्र्यांच्या शिवसंकल्प अभियानाची ६ जानेवारीला शिरूर लोकसभेतून सुरुवात होतेय. याद्वारे ते शक्तिप्रदर्शन करून शिरूर लोकसभेवर दावा ठोकणार असल्याची चर्चा आहे. त्यामुळे आगामी काळात शिरूर लोकसभेवरून शिंदे गट विरुद्ध अजित पवार गटात संघर्ष पाहायला मिळण्याची शक्यता आहे. तर, मुख्यमंत्री शिंदे यांच्या दौऱ्याबद्दल शिवाजी आढळराव पाटील (डहळींरक्षळऑरे अवहरश्ररऑरे झरींळश्र) यांनी माहिती दिली आहे. महायुतीमध्ये शिरूर लोकसभेची जागा कोणी लढवावी यावरून दावे-प्रतिदावे सुरू आहे. शिरूर लोकसभेची जागा आम्ही लढू आणि जिंकून देखील आणू असा दावा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केला आहे. विशेष म्हणजे महायुतीत असलेल्या अजित पवारांनी हा दावा परस्पर केला आहे. अजित पवारांच्या याच दाव्यानंतर आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे देखील शिरूर लोकसभा मतदारसंघात मेळावा घेत आहे. तर, शिंदे गटाकडून शिवाजीराव अढळराव पाटील हे उमेदवार असल्याचा दावा त्यांच्या समर्थकांकडून केला जात आहे. याबाबत बोलतांना शिवाजी आढळराव पाटील म्हणाले की, ''शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांचा पराभव करण्याचा निर्धार करणारे अजित पवारचं शिरूर लोकसभेचा त्यांचा उमेदवार कोण असेल हे तेच ठरवतील. मात्र, मी शिंदे गटातच राहणार. अजित पवार गटाचे तिकीट घेऊन शिरूरची निवडणूक लढणार, या चर्चांना अद्याप अजित दादांनी ही दुजोरा दिलेला नाही. मात्र, मी शिरूर लोकसभेची निवडणूक लढणार हे निश्चित असल्याचे शिवाजी आढळराव पाटील म्हणाले. पुढे बोलतांना शिवाजीराव आढळराव पाटील म्हणाले की, अजित पवारांच्या घोषणेनंतर आम्ही त्यांना प्रतिउत्तर देत असल्याच्या जो काही संभ्रम निर्माण झाला आहे, तशी प्रत्यक्षात वस्तुस्थिती नाही.

# पुण्यात सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकल्यास आता ५०० रुपये दंड!

## महापालिकेचा प्रस्ताव; सध्या १८० रुपये दंडाची तरतूद

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** सार्वजनिक ठिकाणी, पदपथ आणि रस्त्यांवर कचरा टाकणाऱ्यांना जरब बसावी, यासाठी दंडाची रक्कम वाढविण्याचा प्रस्ताव महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने तयार केला आहे. त्यानुसार दंडाची रक्कम ५०० रुपये करण्यात आली आहे. यापूर्वी उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांना केवळ १८० रुपयांचा दंड आकारला जात होता. मात्र दंडाच्या रकमेत वाढ केल्याने सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकण्याचे प्रकार थांबतील, असा दावा महापालिका प्रशासनाकडून करण्यात आला आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागाचा हा प्रस्ताव अतिरिक्त आयुक्तांच्या मान्यतेनुसार आयुक्त कार्यालयाकडे पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर स्थायी समिती आणि मुख्य सभेच्या मान्यतेनंतर राज्य शासनाकडे तो पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर या प्रस्तावाची अंमलबजावणी होणार आहे. मात्र, दंडाची रक्कम वाढविल्यानंतरही सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकण्याचे प्रकार थांबण्याची शक्यता कमीच आहे. सार्वजनिक



ठिकाणी, पदपथांवर, उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांविरोधात महापालिकेकडून दंडात्मक कारवाई केली जाते. उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांना सध्या नियमानुसार १८० रुपयांचा दंड आकारला जातो. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे, लघुशंका करणे, थुंकणे, कचऱ्याचे वर्गीकरण न करणे, कचरा जाळणे, प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर, ओला कचरा जिरविण्यासाठी बल्क वेस्ट यंत्रणा कार्यान्वित न ठेवणे आदींसाठी हा दंड केला जातो. दंडाची रक्कम पूर्वी शासन मान्यतेने निश्चित करण्यात आली आहे. त्यात कालानुरूप वाढ झालेली नाही. त्यामुळे दंडाच्या रकमेत वाढ करण्यात आली असून, यापुढे १८० रुपयांऐवजी ५०० रुपयांचा दंड आकारण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. दंडाची रक्कम कमी असल्याने उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांचे प्रमाण वाढत असून, त्यांना जरब बसत नाही. कचरा टाकताना सापडल्यास १८० रुपये भरून नागरिक मोकळे होतात. त्यामुळे दंड रक्कम वाढत असली, तरी शहर अस्वच्छ राहण्याचे प्रमाण कायम राहत आहे. महापालिकेच्या प्रस्तावानुसार दंडाच्या रकमेत वाढ होणार असली, तरी ही रक्कमही फार मोठी नाही. त्यामुळे कचरा टाकण्याच्या प्रकारांना आळा बसण्याची शक्यताही कमीच असल्याचे दिसत आहे.

> **“सार्वजनिक ठिकाणी, उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांना १८० रुपये दंड केला जातो. ही रक्कम पूर्वीच निश्चित करण्यात आली होती. अशा प्रकारांना आळा बसावा, यासाठी अशा प्रकरणात प्रत्येकी ५०० रुपये दंड आकारण्यात यावा, असा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने तयार केला आहे. शासनाच्या मान्यतेनंतर सुधारित दंड आकारला जाईल.**
>
> **-डॉ. कुणाल खेमनार,**
> **अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका**

# कांदा निर्यात बंदी तात्काळ उठवा : डॉ. अमोल कोल्हे

## ३१ मार्च २०२४ पर्यंत कांद्याची निर्यात करता येणार नाही

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** केंद्र सरकारने कांदा निर्यात बंदी केल्यापासून कांद्याच्या दरात सातत्याने घसरण होत आहे. त्यामुळे कांदा निर्यात बंदी तत्काळ उठवावी अशी मागणी खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी केंद्रीयमंत्री पियूष गोयल यांना पत्र पाठवून केली आहे. या बाबत खासदार डॉ. अमोल कोल्हे म्हणाले, केंद्र सरकारने गतवर्षी ८ डिसेंबरला कांदा निर्यात बंदीचा आदेश जारी केला. त्यानुसार शेतकऱ्यांना ३१ मार्च २०२४ पर्यंत कांद्याची निर्यात करता येणार नाही. मात्र कांदा निर्यात बंदी केल्यापासून गेल्या २४-२५ दिवसापासून कांद्याच्या दरात सातत्याने घसरण होत आहे. सद्यस्थितीत उत्पादन खर्चही निघत नसल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. याआधी कांद्यावर ४० टक्के निर्यात शुल्क लादून जवळपास अघोषित निर्यात बंदी लादली होती. त्यातून सावरत कांद्याला योग्य दर मिळण्याची शक्यता निर्माण झाली असताना केंद्र सरकारने कांदा निर्यात बंदी करुन शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या अडचणीत आणले. या संदर्भात केंद्र सरकारने कांदा निर्यात बंदी करून



शेतकऱ्यांच्या ताटात माती कालवली आहे. नुकत्याच पार पडलेल्या संसद अधिवेशनातही कांदा निर्यात बंदीवर चर्चा करण्याची मागणी केल्याने माझे व खासदार सुप्रिया सुळे यांचे निलंबन करण्यात आले. त्यानंतर शेतकऱ्यांची लढाई रस्त्यावर लढण्याचा इशारा देऊन २७ ते ३० डिसेंबर या कालावधीत 'शेतकरी आक्रोश मोर्चा' काढून केंद्र आणि राज्य सरकारला धारेवर धरले होते. परंतु केंद्र सरकार निर्यात बंदी उठविण्यासाठी कोणतीही पावले उचलताना दिसत नाही. खासदार डॉ. कोल्हे म्हणाले की, शेतकऱ्यांच्या बाबतीत केंद्र आणि राज्य सरकार अतिशय असंवेदनशील भूमिका घेत असून ज्या बळिराजाच्या नावाने सत्तेवर आलेत, त्यांनाच देशोधडीला लावण्याचे काम केंद्र व राज्य सरकार करीत आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी कांदा निर्यात बंदी तत्काळ उठवावी अशी मागणी केंद्रीयमंत्री पियुष गोयल यांना पत्र पाठवून करण्यात आली आहे. याबाबत केंद्र शासनाने निर्णय न घेतल्यास कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी आंदोलनाची पुढील दिशा निश्चित करण्यात येईल,असा इशारा खासदार डॉक्टर अमोल कोल्हे यांनी दिला आहे. केंद्र सरकारने कांदा निर्यात बंदी केल्यापासून कांद्याच्या दरात सातत्याने घसरण होत आहे. त्यामुळे कांदा निर्यात बंदी तत्काळ उठवावी अशी मागणी खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी केंद्रीयमंत्री पियूष गोयल यांना पत्र पाठवून केली आहे. या बाबत खासदार डॉ. अमोल कोल्हे म्हणाले, केंद्र सरकारने गतवर्षी ८ डिसेंबरला कांदा निर्यात बंदीचा आदेश जारी केला.